महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या पूर्व माध्यमिक/ माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांना आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. विद्यार्थ्यांना बसण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – 400 032
दिनांक : 10 ऑक्टोबर 2001
**SPE / 2001 / 93979 / (2003/2001) साशि-1**

**संदर्भ : महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे पत्र क्रमांक : शिष्य/स-1/का-1/2001**

**दिनांक : 20 ऑगस्ट 2001 चे पत्र.**

**शासन निर्णय :** महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या पूर्वमाध्यमिक / माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला सध्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांना बसता येते. या परीक्षांना आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. मंडळाच्या संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसण्याची इच्छा आहे व तशी मागणी त्यांच्याकडून केली जात आहे. सदर शाळांतील इयत्ता 4 थी व 7 वी च्या विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार शिष्यवृत्ती परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

2. **आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी :** पूर्व माध्यमिक/ माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी शासन खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

1. सदर परीक्षांसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार वयाची अट राहील.
2. सदर विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेस सध्या प्रचलित असलेले विहीत शुल्क आकारण्यात येते.
3. महाराष्ट्र शासनाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना असलेली परीक्षा फी माफीची सवलत या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.
4. सदर विद्यार्थ्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार केली जाईल.
5. सदर विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्यास पहिल्या 50 विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल व गुणानुक्रम कळविण्यात येईल. मात्र त्यांना शिष्यवृत्तीची रोख रक्कम दिली जाणार नाही.
6. उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना गुणपत्रके देण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(स्वाक्षरीत)**
(पंकजम् नायर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद
सर्व मंत्रालयीन विभाग
शालेय शिक्षण विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने
निवड नस्ती साशि-1